**महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम अंतर्गत विविध बाबींचा नव्याने समावेश करणे व इतर बाबींच्या अंमलबजावणीस नव्याने मान्यता देणेबाबत...**

# महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)**

**शासन निर्णय क्र. मंनिक-२०२५/प्र.क्र.१९/मंनिक-२ (E-१२३७०८८)**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दि. १७ एप्रिल २०२६.

**संदर्भ** :- १) महसुल व वन विभाग ( मदत व पुनर्वसन) शासन निर्णय क्र. आव्यप्र-२०२४/ प्र.क्र ३०/आव्यप्र-१ दि. १३.०३.२०२४

२) महसुल व वन विभाग ( मदत व पुनर्वसन) शासन शुध्दीपत्रक क्र.आव्यप्र-२०२४/ प्र.क्र ३०/आव्यप्र-१ दि.१२.०६.२०२४.

३) महसुल व वन विभाग ( मदत व पुनर्वसन) शासन शुध्दीपत्रक क्र. आव्यप्र-२०२४/ प्र.क्र ३०/आव्यप्र-१ दि.३०.०७.२०२४.

४) महसुल व वन विभाग ( मदत व पुनर्वसन) शासन निर्णय क्र. आव्यप्र-२०२४/ प्र.क्र.३०/ आव्यप्र-१, दि.२८.११.२०२४.

**प्रस्तावना :-**

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा-भीमा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (Maharashtra Resilience Development Program -MRDP) हा कोल्हापूर, सांगली, मिरज, कुपवाड आणि इचलकरंजी या शहरांसाठी राबविण्यात येत आहे. सदरहू प्रकल्प सुरळीतपणे कार्यान्वित होण्यासाठी राज्य मंत्रीमंडळाने दि.०७.०४.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार विविध बाबींचा प्रकल्पामध्ये नव्याने समावेश करणे व इतर बाबींची अंमलबजावणी करणेस मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा भीमा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (Maharashtra Resilience Development Program -MRDP) अंतर्गत घटकांमध्ये खालील बाबी समाविष्ट करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

**अ)** घटक क्र. १- हवामान-अनुकूल पूर धोका व्यवस्थापन (मुख्यत: कृष्णा खोऱ्यातील धरणे, पाटबंधारे यंत्रणा आणि पूर नियंत्रण पायाभूत सुविधा) या घटकांतर्गत, खालील बाबींचा समावेश करण्यात येत आहे:-

- विद्यमान जलसाठा संरचनांचे नकाशांकन करणे, अतिरिक्त संरचनाच्या आवश्यकतेचे परिमाण निश्चित करणे व संरचनात्मक स्थैर्य यांचे स्थिती मूल्यांकन व स्थळविशिष्ट, दुरुस्ती व देखभाल उपाययोजना निश्चित करणे.
- नवीन पूरनिवारण जलसाठा संरचना बांधणे.
- हवामान बदलाशी सुसंगत निसर्गाधारित व अभियांत्रिकी उपाययोजनांचे मॉडेलिंग व डिझाईन.
- मृद व जलसंधारण विभाग अंतर्गत असलेल्या महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ येथे प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Project Implementation Unit) स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ब)** घटक क्र. ४ आपत्ती प्रतिसादासाठी वित्त पुरवठा व विमा संरक्षण दिल्याने खाजगी भांडवल संकलीत करणे (प्रशासकीय आर्थिक सक्षमता वाढविणे आणि विमा समाधान शोधणे) या अंतर्गत आपत्ती जोखमीचे निवारण करण्यासाठी खाजगी भांडवल समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम वित्त कार्यक्रम (Maharashtra Resilience Financing Program-MARP) समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

त्यासाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA) येथे प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU- Project Implementation Unit) स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच PCC (Project Co-ordination Committee) च्या मान्यतेने सल्लागार मंडळाची (Advisory Group) स्थापना करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

यामध्ये विमा सल्लागार, आर्थिक सल्लागार व समन्वयकाची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. MARP सल्लागार मंडळाच्या सहकार्याने हवामान प्रतिरोधक पॅरामेट्रिक विमा योजना विकसीत करण्यासही मान्यता देण्यात येत आहे..

**क)** घटक क्र. ५ अंमलबजावणी सहाय्य व ज्ञान व्यवस्थापन (Mitra संस्थेमार्फत मुल्यांकन, क्षमताविकास व प्रणाली सुधारणा) अंतर्गत GIS आधारित माहिती संकलन करणे त्याआधारे विविध आपत्तीवर अभ्यास व उपाययोजना याचे ज्ञान व्यवस्थापन करणे व त्यासाठी MRDP अंतर्गत प्रकल्प समन्वय समिती (Project Coordination Committee) च्या मान्यतेने अभ्यास गट स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर अभ्यास गटामध्ये राज्यातील आपत्ती प्रतिबंधासाठी काम करणाऱ्या प्रमुख शासकीय संस्थांचा (उदा. MRSAC, NEERI, GSI, IITM इ.) समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे. संबंधित आपत्तीचा प्रभावीरित्या सामना करण्यासाठी, विभाग/ जिल्हा/ शहर स्तरावरील प्रशासनाची प्रतिसाद क्षमता वाढविण्यासंबंधात प्रशिक्षण देण्यात येईल. या घटकाची अंमलबजावणी Project Management Unit (PMU) मित्र मार्फत करण्यात येईल. तसेच, संबंधित कामांना वित्तीय आणि प्रशासकीय मान्यता PMU मित्र मार्फत देण्यात येईल

**ड)** MRDP प्रकल्पाच्या मंजूर आर्थिक मर्यादेच्या चौकटीत राहून, विमा हप्त्यावर सवलत व कर्ज सवलतीसाठी एकूण US$ १९ दशलक्ष इतका निधी मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली,

यापैकी US$१६ दशलक्ष हे प्रीमियम व कर्ज सवलतीसाठी आणि US$३ दशलक्ष हा घटकाच्या अंमलबजावणीसाठी वापरण्यास मान्यता देण्यात आली.

**ढ)** प्रकल्प सुरळीतपणे कार्यान्वित करण्यासाठी, प्रकल्पातील कामाच्या स्वरूपानूसार आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मदत व पुनर्वसन विभागाच्या अस्तित्वात असलेल्या लेखाशीर्षांव्यतिरिक्त १) जलसंपदा विभाग, २) नगरविकास विभाग (दोन) ३) मृद व जलसंधारण विभाग या प्रशासकीय विभागांना नवीन लेखाशीर्ष (महसूली तसेच भांडवली) तयार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ण)** तसेच संबंधित प्रशासकीय विभाग त्यांचे अधिनस्त प्रकल्पांतर्गत कामांना तांत्रिक, प्रशासकीय व वित्तिय मान्यता देतील.

**त)** MRDP प्रकल्प राबविण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करणेबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) क्र. आव्यप्र -२०२४/प्र.क्र.३०/आव्यप्र-०१, दि ३० जुलै २०२४ अन्वये स्थापन केलेली राज्य सुकाणू समिती कायम करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**थ)** सदर प्रकल्पावर देखरेख करण्यासाठी मा. मंत्री आपत्ती व्यवस्थापन व मा. मंत्री जलसंपदा यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली प्रकल्प मुल्यांकन समिती (Project Appraisal Committee - PAC) गठित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर समितीतर्फे दर दोन महिन्यात प्रकल्पाचा आढावा घेण्यात येईल, यास मान्यता देण्यात आली.

२. मा. मंत्री, आपत्ती व्यवस्थापन व मा. मंत्री, जलसंपदा यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली प्रकल्प मूल्यांकन समिती (Project Appraisal Committee - PAC) खालीलप्रमाणे गठित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री, आपत्ती व्यवस्थापन | अध्यक्ष |
| २. | मा. मंत्री, जलसंपदा, (कृष्णा खोरे विकास महामंडळ गोदावरी) | सहअध्यक्ष |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र तथा मा. मुख्यमंत्री यांचे वरिष्ठ आर्थिक सल्लागार | सदस्य |
| ४. | मुख्य सचिव | सदस्य |
| ५. | सचिव/ प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ६. | सचिव/ प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, नगरविकास विभाग (२) | सदस्य |
| ७. | प्रकल्प संचालक MRDP तथा सहमुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र | सदस्य |
| ८. | सचिव/ प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ९. | संचालक, वित्त MRDP | सदस्य |
| १०. | सचिव/ प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन | सदस्य-सचिव |

सदर समितीतर्फे-

(१) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) नुसार कामासाठी वार्षिक आराखडा तयार करुन त्यास मान्यता देणे,

(२) प्रकल्पातील (PIU) च्या कामानुसार आवश्यक तरतूद उपलब्ध करण्यासाठी विभागाकडून तयार करण्यात आलेल्या अर्थसंकल्प आराखड्यास छाननीअंती मान्यता देणे.

(३) प्रकल्पा संदर्भात राज्य सुकाणू समितीला वेळोवेळी सूचना देणे इ. कार्ये करण्यात येतील.

३. घटक ४ मध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या आपत्ती वित्त पुरवठा व विमा संरक्षण या घटकांतील बाबींची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र अंतर्गत खालीलप्रमाणे सल्लागार मंडळ स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे-

| अ.क्र | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र | अध्यक्ष |
| २ | संचालक तथा पदसिध्द उपसचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग | सदस्य |
| ३ | सहसचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ४ | IRDAI प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | NABARD/बँक प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | राज्य विमा महामंडळ | सदस्य |
| ७ | आर्थिक तज्ज्ञ | नामनिर्दिष्ट सदस्य |

प्रस्तुत सल्लागार मंडळाचे कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे असेल:-

- विमा मॉडेल्सचे मार्गदर्शन , त्यानुसार धोरण आराखडे तयार करणे.
- लाभार्थी पात्रता निकष निश्चित करणे
- सवलती व विमा रचना अंतिम करताना PCC ला अहवाल सादर करणे
- योजनांचे मूल्यमापन व पुनरावलोकन करणे.
- सल्लागार समितीचा कार्यकाळ हा प्रकल्प संपेपर्यंत राहील.

४. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (MKVDC) या PIU शी संबंधीत कामांना जलसंपदा विभाग, महानगरपालिका स्तरावरील PIU शी संबंधीत कामांना नगरविकास विभाग - २, आपत्ती व्यवस्थापन प्रभागातील PIU शी संबंधीत कामांना आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मदत व पुनर्वसन हा प्रशासकीय विभाग असणार आहे.

५. मित्र कार्यालयातील गठित केलेले प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Management Unit - PMU) व प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Project Implementation Unit - PIU) या दोन्हीच्या अंतर्गत येणाऱ्या कामांसाठी प्रशासकीय विभाग म्हणून आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मदत व पुनर्वसन विभागास मान्यता देण्यात येत आहे.

६. महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (Maharashtra Resilience Development Program -MRDP) अंतर्गत घटक क्र.१, ४ आणि ५ मध्ये या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या बाबींसाठी होणारा खर्च हा जागतिक बँकेच्या Aide Memorie नुसार, राज्य सुकाणू समितीच्या मान्यतेने आणि महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (Maharashtra Resilience Development Program -MRDP) साठी उपलब्ध असलेल्या तरतूदींमधून भागविण्यात येईल.

७. घटक-१ साठीचा खर्च हा तूर्तास " मागणी क्र. सी-१० (०१) पुरनियंत्रण १०३ नागरी बांधकामे (०१) (०१) कोल्हापूर व सांगली जिल्हातील कृष्णा व भिमा खोऱ्यातील पूर नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविणे (३० टक्के राज्य हिस्सा) (कार्यक्रम ) लेखाशिर्ष (४७११-३१३७) (०१) (०२) कोल्हापूर व सांगली जिल्हातील कृष्णा व भिमा खोऱ्यातील पूर नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविणे (७० टक्के बाह्य सहाय्यित प्रकल्प - जागतिक बँक कर्ज) (कार्यक्रम) लेखाशिर्ष (४७११-३१४६)" यामधुन खर्ची टाकण्यात येईल. तथापि मृद व जलसंधारण विभागास नव्याने लेखाशीर्ष प्राप्त झाल्यावर त्यातून सदर खर्च करण्यात येईल.

तसेच घटक-४ व घटक-५ साठीचा खर्च हा "मागणी क्रमांक सी ६(०१) (०२) कोल्हापूर व सांगली जिल्हातील कृष्णा व भिमा खोऱ्यातील पूर नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविणे (७० टक्के बाह्य सहाय्यित प्रकल्प - जागतिक बँक कर्ज) (कार्यक्रम )लेखाशिर्ष (२७११-०९९४) व मागणी क्रमांक सी ६(०१) (०१) कोल्हापूर व सांगली जिल्हातील कृष्णा व भिमा खोऱ्यातील पूर नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविणे (३० टक्के राज्य हिस्सा ) (कार्यक्रम ) लेखाशिर्ष (२७११-०९८५)" मधून खर्ची टाकण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०४१७१२५७५४३११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DATTATRAY HANMANT KADAM

Digitally signed by DATTATRAY HANMANT KADAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department, 2.5.4.20=CF316337E92D3C54DA432222208093BFC6ED1D1570F09466351527 3D0B4D27FC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A923979CF886D5724FBED87CD57745C3F72EBA57B0D277F11 E970F0AACA99802, cn=DATTATRAY HANMANT KADAM
Date: 2026.04.17 12:59:06 +05'30'

**( दत्तात्रय कदम)**

**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
५. मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन,मुंबई
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन मुंबई
७. मा. मंत्री, आपत्ती व्यवस्थापन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

८. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई

९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई

१०.मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय विभाग (सर्व)

११.सहसचिव तथा वित्तीय सल्लागार, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई

१२.आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन विभागातील सर्व कार्यासने

१३.निवड नस्ती